नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २१/११/२०२५ (शुक्रवार )**

# अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस स्टेशन काटोल,नरखेड आणि खापा हद्‌दीतील एस.एस.टी पॉईन्ट तसेच स्ट्रॉंग रूम येथे भेट देवुन आगामी निवडणुक संदर्भात सुरक्षा उपाययोजनांची केली तपासणी

आगामी नगर परिषद/नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने आज दिनांक २१/११/२०२५ रोजी श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी पोलीस स्टेशन काटोल, नरखेड आणि खापा हद्‌दीतील एसएसटी (स्टॅटिक सर्व्हेलन्स टीम) पथकाला तसेच स्ट्रॉंग ला येथे भेट दिली. श्री अनिल म्हस्के यांनी काटोल पोलीस स्टेशन हद्‌दीतील नागपुर टोल नाका आणि पारडसिंगा रोड, एसएसटी पथकाला भेट दिली. पोलीस स्टेशन नरखेड हद्‌दीतील नरखेड, मोहदी दळवी आणि बस स्टॉप चौक, मोवाड येथील एसएसटी पथकाला भेट दिली. तसेच मोवाड नगर परीषद आणि नरखेड नगर परिषद येथे स्ट्रॉंग रूम ला भेट दिली. खापा पोलीस स्टेशन हद्‌दीतील फॉरेस्ट नाका, एसएसटी पथकाला आणि सिंदेवाणी येथील आंतरराज्यीय नाकाबंदी पॉईन्टला भेट देवुन तपासणी केली. खापा नगर परिषद येथील स्ट्रॉंग रूम ला भेट दिली. श्री अनिल म्हस्के यांनी एसएसटी पथकाच्या सदस्यांना सतर्क राहण्याच्या तसेच बेकायदेशीर हालचालींवर सर्तकतेने नजर ठेवुन त्वरित कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. तसेच स्ट्रॉंग रूम चे सी.सी.टी.व्ही कॅमरे तसेच इतर सुरक्षा उपाययोजना स्वत: तापासुन संबधीतांना महत्त्वाच्या सुचना दिल्या.

सदर भेटी दरम्यान श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्यासह निवडणुक अधिकारी तसेच इतर प्रशासकिय अधिकारी आणि संबधीत पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी हजर होते.


नगर परिषद खापा
सार्वत्रिक निवडणूक - २०२५
स्थिर देखरेख पथक
ठिकाण : जवाहर हायस्कूल, खापा


STRONG ROOM

## हद्दपार आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक २०/११/२०२५ रोजी संध्याकाळी जलालखेडा पोलीसांना गोपनिय माहीती प्राप्त झाली की, हद्दपार इसम नामे राजेन्द्र जर्नाधिन पवार, वय ५० वर्ष, रा. हिवरमठ हा त्याचे हिवरमठ येथील झोपडी मध्ये वास्तव्य करीत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा हिवरमठ, पारधी बेडा येथे जावुन शाहनिशा केली असता हद्दपार आरोपी राजेन्द्र जर्नाधिन पवार, वय ५० वर्ष, रा. हिवरमठ त्याचे राहते झोपडीत मिळुन आला. नमुद आरोपीला उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांनी नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले असुन नमुद आरोपीने कोणतीही कायदेशीर परवानगी न घेता हद्पार आदेशाचे उल्लंघन करून नागपुर जिल्हयात प्रवेश केला असल्याने नमुद आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन जलालखेडा येथे कलम १४२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हे नोंद केला आहे.

## अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध ,अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन आरोली येथे दिनांक ०९/१२/२०२३ रोजी अप क्र ३८५/२०२३ कलम ३६३,३७० भादवि अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलीचा शोध लागत नव्हता. नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी हीचा शोध घेण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांचे कडे वर्ग करण्यात आला. श्री मिलींद तायडे, प्रभारी अधिकारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात पोउपनि श्री मंगेश वानखडे, मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे, पोशि पन्नालाल बटाउवाले त्यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला. नमुद अपहृत मुलगी ही दरम्यान काळात मध्यप्रदेश राज्य, बालाघाटा जिल्हयातील मलाजखंड पोलीस स्टेशन अंतर्गत पाथरी पोलीस चौकी मधील गंजेसरा या नक्षलग्रस्त भागात राहत असल्याचे तांत्रिक पुराव्यावरून निदर्शनास आले होते. परंतु नमुद मुलगी ही मिळुन येत नव्हती. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण चे तपास पथक यांनी सदर भागातील प्रतिष्ठीत नागरिकांशी संपर्क साधुन त्यांच्या मदतीने दिनांक २१/११/२०२५ रोजी नमुद

गुन्हयातील अपह्रत मुलगी हीला नागपुर येथे ताब्यात घेतले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास अरोली पोलीस करीत आहेत.

## आगामी निवडणुक दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता काटोल पोलीस स्टेशन येथे काढण्यात आला रूट मार्च

आगामी नगर परिषद/नगर पंचायत निवडणुक २०२५ असल्याने नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत नमुद निवडणुक कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता दिनांक २१/११/२०२५ पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत रूटमार्च काढण्यात आला. रूट मार्च पोलीस ठाणे काटोल येथून सुरू होऊन.मेन रोड ने पटेल बिल्डिंग, दुर्गा चौक, नेहरू बाजार,जैन मंदिर चौक,शास्त्री चौक,नगर परिषद चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक,या मार्गाने घेण्यात आला. सदर रूट मार्च मध्ये पोलीस निरीक्षक श्री रंजित शिरसाठ, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन काटोल यांच्यासह पोलीस स्टेशन काटोल येथील अधिकारी अंमलदार , दंगा नियंत्रण पथक चे अंमलदार हजर होते.






## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे,दारू बाळगुण विक्री,वाहतुक तसेच सेंवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २२ गुन्हे नोंद.

दिनांक २०/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, वाहन तसेच इतर साहीत्य असा **एकुण २,३०,४७०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन मौदा येथे एकुण १ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कन्हान येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे १ गुन्हा नोंद आहे. . पोलीस स्टेशन जलालखेडा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे २ गुन्हे नोंद आहे . पोलीस स्टेशन खापा येथे २ गुन्हे नोंद आहे . पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन उमरेड येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कुही येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन भिवापुर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन पारशिवणी

येथे १ गुन्हा  नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे २ गुन्हे नोंद आहे महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण २२ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ११३४० मिली देशी दारू, १२३७  लीटर मोहाफुल दारू, ११४० लिटर सडवा, मोटर सायकल तसेच इतर साहीत्य असा एकुण २,३०,४७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार तपासले आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक २०/११/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक २१/११/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत आणि पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी अंतर्गत पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. नाकाबंदी करून वाहने तपासण्यात आली.  सदर कोबिंग ऑपरेशन आणि नाकाबंदी श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार  हजर होते.




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने